अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.: अतिमआ/साप्र/आस्था/ ५३८८
दिनांक :- ४/११/२०२०

-: आदेश :-

विषय :- पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील श्री. सुनिल इंदलकर, उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचे रजा कालावधीत त्यांचे पदाचे कामकाज व्यवस्थेबाबत.

संदर्भ :- १) जावक क्र. साप्रवि/आस्था/५३६२, दिनांक ०२/११/२०२०.
२) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. १/३९४, दिनांक ०३/११/२०२०.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील 'उप आयुक्त (सामान्य प्रशासन)' या पदावर कार्यरत श्री. सुनिल इंदलकर यांनी संदर्भ क्र. १ च्या अर्जान्वये दिनांक ०२/११/२०२० ते दिनांक १२/११/२०२० (दिनांक १३/११/२०२० ते दिनांक १६/११/२०२० या शासकीय सुट्टीस जोडून) अर्जित रजेची मागणी केली आहे. त्यास मा. महापालिका आयुक्त यांनी संदर्भ क्र. २ अन्वये मान्यता दिली आहे.

श्री. सुनिल इंदलकर यांचे रजा कालावधीत सामान्य प्रशासन विभाग आणि मध्यवर्ती भांडार विभागाचे कामकाज श्रीमती वनश्री लाभशेटवार, उप आयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन) यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

श्रीमती वनश्री लाभशेटवार, उप आयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन) यांनी स्वत:चे पदाचे कामकाज सांभाळून सामान्य प्रशासन विभाग आणि मध्यवर्ती भांडार विभागाचे अतिरिक्त कामकाज करावयाचे आहे.

श्रीमती वनश्री लाभशेटवार, उप आयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन) यांनी वरीलप्रमाणे अतिरिक्त पदभार स्विकारलेबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

Rubal 3/11/2020
(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :- खातेप्रमुख (सर्व),
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस पुढील कार्यवाहीस्तव सादर . . . .